# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २३/२०१२-१३ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आनंदा धोंडी अर्जुन,<br>मेन रोड, आय.सी.आय.सी बँकेच्या मागे,<br>पलुस, ता. पलुस, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, विटा, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, किर्लोस्करवाडी, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. आनंदा धोंडी अर्जुन, पलुस, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची ' अ ' मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी किर्लोस्करवाडी उप विभाग, विटा विभागा विरुध्द तक्रार दि. ३०.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार यांनी शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. १७.११.२००९ रोजी अर्ज केला. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार केल्यानंतर दि. २१.९.२०११ ला चलन दिले ते दि. ३.१०.२०११ ला भरले व त्याचदिवशी चाचणी अहवाल दिला, अद्याप त्यांना वीज जोडणी देण्यात आली नाही. तरी अर्ज दिल्यापासून कनेक्शन देईपर्यंत सर्वस्तरावरील नुकसान भरपाई मिळावी व कनेक्शन मिळावे अशी मागणी केली आहे. अंतर्गत कक्षाचे आदेश होऊनही कुठलीही कार्यवाही केली नाही. तक्रारीसोबत प्रोसेसिंग फीची झेरॉक्स, चलन, चलन भरल्याची पावती, कक्षाचा आदेश जोडला आहे.

वितरण कंपनीने नोटीस देवूनही दि. २३.५.२०१२ पर्यंत आपला लेखी अहवाल सादर केला नाही. प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. २९.६.२०१२ रोजी मंचासमोर घेण्यात आली, त्यावेळी वि.प.ने आपले म्हणणे दाखल केले. त्यामध्ये तक्रारदाराचा वीज मागणी अर्ज किर्लोस्करवाडी उप विभागाकडे दि. १७.११.२००९ रोजी प्राप्त झाला. सदर अर्ज शाखा कार्यालय पलूस १ यांचेकडे दि. २७.११.२००९ ला पाठविला. सदरचे शाखा अधिकारी श्री. कराडकर यांनी अंदाजपत्रक दि. १८.६.२०१० ला केले व ते दि. २३.६.२०१० रोजी विटा विभागाकडे अंदाजपत्रक मंजुरीसाठी पाठविण्यात आले. सदरचे अंदाजपत्रक दोन विभागात एच.टी. लाईन व एल.टी.लाईन असे करण्याचे विटा विभागाने कळविले. तसेच श्री. कराडकर यांची बदली होवून त्यांच्या जागी श्री.भोसले हजर झाले. त्यांनी सदरचे अंदाजपत्रक दि. ४.७.२०११ रोजी दोन विभागात करुन किर्लोस्करवाडी उप विभागाकडे पाठविले. दि. २१.९.२०११ रोजी विटा विभागीय कार्यालयाने अंदाजपत्रकास मंजुरी दिली. ग्राहकाने चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दि. ४.१०.२०११ ला दिल्याचे मान्य केले आहे. सदर ग्राहकाचे शेतीपंप वीज कनेक्शन दि. २८.६.२०१२ रोजी देण्यात आले आहे. सदरचे कनेक्शन हे गावठाण फिडरवरच्या लाईनवर येत असल्यामुळे सदर ठिकाणी शेतीपंप लाईनवरुन जादा रोहित्राचे काम करुन घेतले आहे त्यामुळे सदर कनेक्शनला विलंब झाला आहे. ग्राहकाचे शेतीपंप कनेक्शन दि. २८.६.२०१२ रोजी झाल्यामुळे सदर कनेक्शनबाबत कुठलीही तक्रार नसलेचे ग्राहकाने लेखी कळविले आहे ते पत्र स्वतंत्ररित्या मंचाकडे पाठवित आहे, विलंबापोटी ग्राहकाने मागितलेल्या भरपाईबद्दल माफी मिळावी असे म्हटले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. २९.६.२०१२ रोजी मंचासमोर घेतली असतां, तक्रारदार गैरहजर. वि.प. तर्फे श्री. व्हनमाने, सहाय्यक अभियंता, किर्लोस्करवाडी उप विभाग उपस्थित. त्यांनी रोहित्र उभारणीच्या कामामुळे विलंब झाल्याचे मान्य केले. त्यासाठी अंदाजपत्रक दोनदा करण्यात आले, स्थानिक अधिकाऱ्यांची बदली झाली, रोहित्राचे कामामुळे विलंबा झाला, ग्राहकाने ' भरपाई नको ' असा अर्ज दिला आहे तो स्वतंत्ररित्या पाठवित असल्याचे मंचासमोर सांगितले. तथापि दि. १६.७.२०१२ पर्यंत तसा अर्ज मंचाकडे प्राप्त झाला नाही.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहेत.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे चलन देण्यास व वीज जोडणी देण्यास विलंब झाल्यामुळे ग्राहक भरपाई मिळणेस हक्कदार आहे काय ?

उत्तर : होय

२) ग्राहकास वीज कनेक्शन देण्याचे आदेश वि.प.स करणे योग्य आहे काय ?

उत्तर :होय

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## कारणमिमांसा

तक्रारदार यांनी दि. १७.११.२००९ रोजी शेतीपंप वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे अर्ज केला. लघुदाब वाहिनी विस्तार असलेने कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार ३ महिन्यात वीज जोडणी द्यावी असे म्हटले आहे. प्रत्यक्षात ग्राहकाला दि. २१.९.२०११ रोजी चलन देण्यात आले आहे. वि.प.चे स्थानिक अधिकारी श्री. व्हनमाने यांनी मंचासमोर सांगितले की, एच.टी. व एल.टी. याचे एकत्रित अंदाजपत्रक मंजुरीसाठी पाठविले व नंतर वेगवेगळे करुन पाठविले. जवळजवळ २२ महिन्यानंतर दि. २१.९.२०११ रोजी विटा विभागीय कार्यालयाने अंदाजपत्रकास मंजुरी दिली. रोहित्राच्या कामासाठी विनियमातील तरतुदीनुसार असलेला १ वर्षाचा कालावधी वगळून १० महिन्याचा विलंब झाल्याचे प्रथमदर्शनी दिसते. कृती मानके विनियम व परिशिष्ट अ मधील तरतुदीनुसार ग्राहकास भरपाई मिळणेचा हक्क आहे व वितरण कंपनीची ती जबाबदारी आहे. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. वि.प.चे स्थानिक अधिकारी श्री. व्हनमाने यांनी दि. २८.६.२०१२ ला ग्राहकास वीज जोडणी देण्यात आली आहे व त्या बाबतचा पूर्तता अहवाल संबंधित फॉर्ममध्ये मंचामध्ये दाखल करतो असे मंचासमोर कबूल केले होते, परंतु अद्याप तो प्राप्त झाला नाही. त्याचप्रमाणे ग्राहकाचे कनेक्शन मिळाल्यामुळे कंपनीविरुध्द कुठलीही तक्रार नाही, भरपाई नको या बाबतचे पत्र स्वतंत्ररित्या मंचास पाठवित असल्याचे सांगितले.

आज रोजी दि. १७.७.२०१२ ला किर्लोस्करवाडी उप विभागाचे दि. १०.७.२०१२ चे पत्र व त्यासोबत ग्राहकाचा मंचाला अग्रेषित केलेला अर्ज तसेच मीटर बाबतची माहितीची प्रत सहाय्यक लेखापाल श्री. रवि जाधव यांनी मंचात आणून दिली. ग्राहकाने भरपाई नको असे अर्जात लिहून दिले आहे व दि. २८.६.२०१२ ला वीज जोडणी दिली आहे असे त्यात स्पष्ट केले आहे. त्यामुळे ग्राहकास वीज जोडणी दिल्याने त्याबाबत आदेश देण्याची आवश्यकता नाही असे मंचाचे मत झाले आहे.

खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदार ग्राहकाची वीज जोडणी मिळणेची मागणी पूर्ण झाली असल्याने त्यासाठी वेगळे आदेश करण्याची आवश्यकता नाही.

३) ग्राहकास विनियमातील तरतुदीनुसार असणारा रोहित्राचा १ वर्षाचा कालावधी वगळून चलन व वीज जोडणी देण्यास विलंब झालेला आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार १० महिन्याच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई द्यावी. सदर रकमेचे प्रथम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजन करुन उर्वरित रक्कम गाहकास रोखीने द्यावी.

४) ग्राहकाने वीज जोडणी झाल्याचे आपल्या पत्रात मान्य केले आहे, तसेच भरपाई नको असेही म्हटले आहे. त्यामुळे भरपाईच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता नाही.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com